राज्यातील शासनमान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीची योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे सुरू ठेवण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन
## आदिवासी विकास विभाग
## शासन निर्णय क्रमांकः व्यअप्र-२०१६/प्र.क्र.१२२/का.१२

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: ३१ मार्च, २०१६.

**वाचा -**

१) शासन निर्णय क्रमांकः उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.टीईएम-२०१५/प्र.क्र.२१९/ तांशि-४, दि.३१ मार्च, २०१६.

**प्रस्तावना -**

राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती या योजनेस प्रथम सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षाकरीता मंजूरी देण्यात आली होती. त्यानंतर सन २०१४-१५ पर्यंत दरवर्षी सदर योजना राबविण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे. सदरहू योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून सुरु ठेवण्याबाबतच्या प्रस्तावास दिनांक १७.०३.२०१६ च्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये सुधारणांसह मान्यता देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.३१.०३.२०१६ रोजीच्या शासन निर्णयाच्या धर्तीवर सदरहू योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे सुधारीत अटी व शर्तीनुसार सुरु ठेवण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

### शासन निर्णय -

राज्यातील शासकिय, अशासकिय, अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालये /तंत्रनिकेतने आणि शासकिय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची सन २०१५-१६ या वर्षापासून शिक्षण शुल्क समिती, प्राधिकरण किंवा परिषदेने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्कांची प्रतिपूर्ती करण्यास शासन मान्यता देत आहे.

२. सदर योजना सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून खालील व्यावसायिक अभ्यासक्रमांत प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमाच्या पूर्ण कालावधीपर्यंत लागू राहील.

अ) आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रम (वैद्यकीय, दंत, होमिओपॅथी, युनानी, आयुर्वेद, भौतिकोपचार, व्यवसायोपचार व नर्सिंग)

ब) उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत असणारे अभ्यासक्रम :

| पदविका | पदवी | पदव्युत्तर पदवी |
|---|---|---|
| अभियांत्रिकी | अभियांत्रिकी | एम.बी.ए. |
| औषधनिर्माणशास्त्र | औषधनिर्माणशास्त्र | एम.सी.ए. |
| एच.एम.सी.टी. | एच.एम.सी.टी. | -- |
| -- | वास्तुशास्त्र | -- |

क) कृषी, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभागांतर्गत पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच बी.एस.सी. (जैव तंत्रज्ञान).

ड) इयत्ता १० वीची शालांत परिक्षा (एस.एस.सी/सी.बी.एस.सी. व तत्सम) उत्तीर्ण झाल्यानंतरचे महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे पूर्ण वेळ अभ्यासक्रम.

**३.** या योजनेचा लाभ अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना पुढील **अटी व शर्तींच्या** अधिन राहून देण्यात येईल:-

१) सदरहू योजनेचा लाभ शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पूर्वी वा चालू शैक्षणिक वर्षामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमांच्या पूर्ण कालावधीपर्यंत या आदेशातील अटी शर्तीनुसार लागू राहील.

२) अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी शासनाच्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा (सी.ई.टी.) प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना लागू राहील. सदर योजनेचा लाभ संस्था स्तरावर करण्यात येत असलेल्या (Institutional Level Quota) परिक्षेद्वारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

३) आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांसाठी शासनाच्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा (सी.ई.टी.) प्रवेश घेतलेल्या तसेच खाजगी विनाअनुदानीत महाविद्यालयाच्या वतीने तसेच असोसिएशनमार्फत घेण्यात येणाऱ्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा (Associate CET) आणि इ.१२ वी च्या गुणांच्या आधारे काही अभ्यासक्रमांसाठी (उदा.नर्सिंग) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू राहील.

४) शालेय शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित, अध्यापक विद्यालय (डी.एड) व उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या अध्यापक महाविद्यालयांमध्ये (बी.एड) शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्काची प्रतिपूर्ती सध्या शासकीय दराप्रमाणे करण्यात येते. तेथे ती पुढे चालू ठेवण्यात यावी.

५) कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्यव्यवसायाच्या काही अभ्यासक्रमांसाठी शासनाची सामायिक परिक्षा (सी.ई.टी.) घेण्यात येत नाही. त्यावेळी इ. १२ वी च्या गुणांच्या आधारावर अशा अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ही योजना लागू राहील.

६) तंत्र शिक्षणाशी निगडीत पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी ज्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे (CAP) प्रवेश घेतलेला आहे, अशा विद्यार्थ्यांना ही योजना लागू राहील.

७) थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी तसेच औषधीनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमास केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे (CAP ) प्रवेश घेतलेला आहे, अशा विद्यार्थ्यांना ही योजना लागू राहील.

८) सदरहू योजनेचा लाभ एआयईईई कोटयातून प्रवेश घेणा-या महाराष्ट्र राज्यातील उमेदवारांनाही लागू राहील.

९) सदरहू योजना ही खाजगी अभिमत विद्यापीठात (Deemed University) अथवा खाजगी स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठातील अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणत्याही परिस्थितीत अनुज्ञेय राहणार नाही.

१०) ही योजना अनिवासी भारतीयांकरिता (N.R.I.) विहीत कोट्यात व्यवस्थापनामार्फत देण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

११) शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांपैकी केवळ काणत्याही एकाच योजनेंतर्गत लाभ मिळण्यास संबंधित विद्यार्थी पात्र असेल. म्हणजेच अन्य योजनेच्या माध्यमातुन विद्यार्थी कोणत्याही शिष्यवृत्ती / शुल्क प्रतिपुर्तीचा लाभ घेत असल्यास तो विद्यार्थी या योजनेंतर्गत लाभ मिळण्यास पात्र असणार नाही.

१२) आरक्षणाचा लाभ न घेता, गुणवत्तेनुसार खुल्या गटातील जागांवर प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी सुध्दा सदरची योजना लागू राहील.

१३) सदर योजनेचा लाभ घेणाऱ्या सर्व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येवू नये.

१४) सदर योजनेंतर्गत देण्यात येणारा लाभ हा शासनाने निश्चित केलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केवळ महाराष्ट्र राज्यातील अधिवास प्रमाणपत्र असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीच मर्यादित राहिल.

१५) लाभार्थी विद्यार्थ्याने नियमितपणे महाविद्यालय / तंत्रनिकेतनामध्ये शिक्षणासाठी वर्गात उपस्थित राहणे आवश्यक राहिल व प्रत्येक सत्र अथवा वर्षाची परीक्षा देणे आवश्यक राहिल. केवळ विशिष्ट परिस्थितीत विशेषत: आजारपणाच्या कारणास्तव परीक्षा देणे शक्य झाले नसल्यास तसे संबंधित विद्यार्थी व शैक्षणिक संस्थेने शिफारस केल्यानंतर संबंधीत प्रकल्प अधिकारी, यांनी प्रमाणित करणे आवश्यक राहिल.

१६) पात्र लाभार्थी विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेतल्यानंतर एखादया सत्राची (सेमिस्टरची) परीक्षा दिली नसल्यास अथवा एखादया शैक्षणिक वर्षात अनुत्तीर्ण झाल्याने त्या वर्षासाठी प्रवेश मिळाला नसल्यास पुढील वर्षाकरिता सदर योजनेंतर्गत सदर विद्यार्थी लाभ मिळण्यास अपात्र राहिल.

१७) तथापि, तदनंतर पुनश्च: त्या सत्र/वर्षात परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर अथवा अंशत: पास (ATKT) झाल्याने त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाल्यास सदर योजनेतील लाभासाठी पुन्हा पात्र ठरेल.

१८) परंतु असे पात्र लाभार्थी विदयार्थी अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यानंतर संपूर्ण अभ्यासक्रमाच्या एकूण कालावधीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळी पूर्णत: अनुत्तीर्ण झाल्यामुळे त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाला नसेल तर संबंधित विद्यार्थी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या उर्वरित कालावधीसाठी सदर योजनेंतर्गत लाभाकरिता कायमस्वरुपी अपात्र ठरेल.

१९) लाभार्थी विदयार्थी व संबंधित शिक्षण संस्था यांनी सदर योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी सादर केलेल्या अर्जात चूकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती सादर केल्यास त्यास उर्वरित अभ्यासक्रमाच्या कालावधीसाठी लाभ देण्यात येणार नाही. तसेच, त्या विद्यार्थ्याला/संस्थेला त्यांनी सादर केलेल्या चूकीच्या माहितीच्या आधारे त्यापूर्वी मिळालेल्या लाभाच्या संपूर्ण रकमेची व्याजासह वसूली करण्यात येईल व कोणत्याही योजनेंतर्गत संबंधित विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती/शुल्क प्रतिपूर्ती मिळण्यास प्रतिबंधित केले जाईल. या संदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याची असेल.

२०) संबंधित विद्यार्थी स्वत:च्या चुकीच्या वर्तनामुळे समाधानकारक शैक्षणिक प्रगती करीत नसल्याबाबत किंवा संबंधित प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय अनियमितपणे गैरहजर राहणे इत्यादी स्वरुपाचे गैरवर्तन करत असल्याबाबत संबंधित शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाने निदर्शनास आणले तर अशा विद्यार्थ्याची शुल्क प्रतिपूर्ती थांबविण्यात किंवा रद्द करण्यात येईल.

२१) ज्या अभ्यासक्रमाकरिता पात्र लाभार्थी विद्यार्थ्यास प्रतिपूर्ती प्रदान करण्यात आली आहे तो अभ्यासक्रम संबंधित विद्यार्थ्याने मध्येच सोडला तर अशा विद्यार्थ्यास प्रदान केलेल्या प्रतिपूर्तीची रक्कम राज्य शासनास योग्य वाटल्यास त्याच्या/तिच्याकडून वसुल केली जाईल.

२२) सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबत कोणत्याही पूर्वसूचना न देता बदल अथवा सुधारणा करण्याचे अधिकार शासनास राहतील व असे बदल केल्यामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्याबाबतचा दावा कोणत्याही विद्यार्थ्यास किंवा शैक्षणिक संस्थेस अथवा विद्यार्थ्याच्या पालकांना शासनाच्या विरुध्द करता येणार नाही.

२३) सदर योजनेच्या लाभाकरिता शासकीय अथवा शासन अनुदानित शैक्षणिक संस्था किंवा शासकीय विदयापीठ वगळून अन्य सर्व खाजगी विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमधील पात्र विदयार्थ्यांचे प्रवेश व विद्यार्थ्यांकडून आकारावयाचे असलेले शिक्षण शुल्क हे महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक (प्रवेश व शिक्षण शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतूदीनुसार शुल्क नियामक प्राधिकरणाकडून प्रत्येक वर्षी निश्चित करुन अंतिम करणे आवश्यक राहील.

२४) सदर योजनेंतर्गत पात्र असणारे व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या संबंधित शैक्षणिक संस्थांनी पुढील ३ वर्षाच्या आत म्हणजेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पर्यंत सक्षम शिखर संस्थेकडून मूल्यांकन व दर्जाचा मानांकन प्राप्त करणे (Assessment and Accreditation) आवश्यक राहील. तदनंतर शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून संबंधित शिखर संस्थांकडून मूल्यांकन व दर्जा निश्चिती करुन मूल्यांकन प्राप्त न केल्यास अशा संस्थांना मुल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त होईपर्यंत या योजनेतून वगळण्यात येईल व त्या वर्षापासून केवळ मानांकन प्राप्त करणाऱ्या शैक्षणिक संस्थेमध्ये प्रथम वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिताच सदर योजना लागू राहील.

<u>**शुल्क प्रतिपूर्तीच्या वितरणाची कार्यपद्धती:-**</u>

२५) सदर योजनेंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या पात्र लाभार्थींचे ऑनलाईन अर्ज स्विकारण्यासाठी ई-विकास प्रणाली कार्यरत असून सदर प्रणाली संबंधित विद्यापीठाशी जोडून त्याद्वारे संबंधित पात्र लाभार्थीनी परीक्षा दिली आहे किंवा नाही याची पडताळणी करण्यासाठीची सोय करण्यात यावी. याकरीता सर्व संबंधित विद्यापीठाकडून सक्षम प्राधिकाऱ्यांना त्यांच्या संगणक प्रणालीशी जोडण्यासाठी आवश्यक असलेले सर्व प्रकारचे सहकार्य करणे अनिवार्य असेल.

२६) प्रत्येक लाभार्थी विद्यार्थ्याचा आधार क्रमांक किंवा विशिष्ट संगणकीय क्रमांक नमूद करुन संबंधित विद्यार्थी प्रत्येक वर्षाच्या प्रथम सत्राच्या / वर्षाच्या परीक्षेस बसला असल्याबाबत संगणकीय प्रणालीव्दारे खातरजमा करुन त्या विद्यार्थ्याची सर्व माहिती शैक्षणिक संस्थेने ऑनलाईन स्वरुपात प्रमाणित करुन ऑनलाईन अर्ज सक्षम अधिकाऱ्याकडे सादर करणे आवश्यक राहिल.

२७) प्रत्येक लाभार्थी विद्यार्थी हा संबंधित शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेतल्याची अथवा शिक्षण घेत असल्याची व शैक्षणिक संस्थेत बनावट विद्यार्थ्यांची नोंद नसल्याची संगणकीय प्रणालीद्वारे पडताळणी करणे आवश्यक असेल.

२८) सक्षम प्राधिकाऱ्यास ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यामधील विद्यार्थ्याची सर्व माहिती व त्यास दिलेला प्रवेश हा प्रवेश नियमन प्राधिकरणाद्वारे वैध ठरविण्यात आल्याची पडताळणी करावी.

२९) पात्र विद्यार्थ्यांची माहिती आधार क्रमांक किंवा विशिष्ट संगणकीय क्रमांकाशी संबंधित संचालनालय/ शैक्षणिक संस्था/विद्यापीठ यांचेकडील अथवा अन्य उपलब्ध व्यक्तिगत माहितीशी संलग्नीत झाल्यानंतर संबंधित विद्यार्थी प्रत्यक्षात शैक्षणिक संस्थेत शिकत असल्याची आणि शैक्षणिक वर्षाच्या प्रथम सत्राच्या परीक्षेस बसला असेल अशा व केवळ उपरोक्त नमूद सर्व अटी/शर्तीची पूर्तता करत असलेल्या विद्यार्थ्यांनाच सदर योजनेतील लाभासाठी पात्र समजण्यात येईल.

३०) ज्या अभ्यासक्रमांना सत्र परीक्षा पध्दती लागू नाही, अशा अभ्यासक्रमाकरीता संबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश हा प्रवेश नियमन प्राधिकरण व संबंधित विद्यापीठाने निश्चित केल्यानंतर विद्यापीठाच्या पटावर नोंदविण्यात आलेला नोंदणी क्रमांक तपासून संबंधित अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांला व

सहा महिन्याचे पट पडताळून त्याला प्रमाणपत्र दिल्यावर लाभासाठी निश्चित करण्यात येईल. संस्थेने खोटे प्रमाणपत्र दिल्यास संस्थेवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

३१) अशा पात्र विद्यार्थ्यांची विहित मर्यादेतील प्रतिपूर्ती सक्षम प्राधिकाऱ्याकडून ही थेट स्वरुपात संबंधित शिक्षण संस्थेला त्यांच्या बँक खात्यात ECS द्वारे प्रतिपूर्ती करणे आवश्यक असेल.

३२) वरीलप्रमाणे पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती केल्यानंतर दरवर्षी अशा लाभार्थी विद्यार्थ्यांची अभ्यासक्रम व शैक्षणिक संस्थानिहाय सविस्तर यादी आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर न चुकता प्रसिध्द करणे बंधनकारक असेल.

३३) तसेच सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांपोटी शासनाकडून संबंधित शैक्षणिक संस्थांना अदा करण्यात येणाऱ्या शुल्क प्रतिपूर्तीबाबत वेळोवेळी संबंधित प्रकल्प अधिकारी यांनी लाभार्थ्यांची शैक्षणिक प्रगती व उपस्थिती बाबत खात्री करावी. त्यासाठी आवश्यक त्या सूचना वेळापत्रकासह संनियंत्रण अधिकाऱ्यांनी निर्गमित कराव्यात. तसेच या योजनेतील त्रुटी संदर्भातील निरीक्षण व फलनिष्पत्तीचा अहवाल प्रकल्प अधिकाऱ्यांनी आयुक्तालयामार्फत शासनास न चुकता वेळोवेळी सादर करणे अनिवार्य असेल.

३४) सदर योजनेंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्याऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क प्रतीपूर्तीची अंमलबजावणी करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प व आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना सनियंत्रन व समन्वयक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३५) सदर योजनेच्या वर नमूद सुधारीत अंमलबजावणीच्या पध्दतीबाबत व योजनेच्या फलनिष्पत्तीसंदर्भात शैक्षणिक वर्ष संपण्यापूर्वी न चुकता सविस्तर आढावा घ्यावा. तसेच आढाव्याअंती आवश्यकतेनुरुप योजनेच्या अंमलबजावणीत सुधारणा सुचविण्यात याव्यात.

३६) या बाबीवर होणारा खर्च मागणी क्रमांक टी-५, मुख्य लेखाशिर्ष २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण - राज्य योजनांतर्गत योजना - (०१)(३३) वैद्यकीय व तत्सम अभ्यासक्रमासाठी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या (२२२५ ३५२९) ३४, शिष्यवृत्त्या व विद्यावेतने या लेखाशिर्षाखाली सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०४०११६०३०८८२२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( सु.ना.शिंदे )**
शासनाचे उप सचिव

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) सर्व विधानसभा/ विधानपरिषद सदस्य.
६) मा.मुख्य सचिव, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
७) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
८) महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
९) अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) प्रधान सचिव, सामाजिक न्याय, व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) प्रधान सचिव, कृषि, पशुसंवर्धन, दुगधव्यवसाय व मत्स्यविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) कुलगुरु, सर्व विद्यापीठे.
१६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
१७) संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१८) आयुक्त आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
१९) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
२०) अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, नागपूर, अमरावती.
२१) सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
२२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.

२३) अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई.
२४) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
२५) सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षाची कार्यालये.
२६) सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी आदिवासी विकास विभाग.
२७) निवडनस्ती का-१२.